# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  १७/०३/२०२३

➢ चोरी :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो स्टे बडनेरा अप क्र. २०५/२३ कलम ३७९, ५११, ३४ भादवी | वैशाली विहार बडनेरा | दि.१७.०३.२३ चे ०६.०० वा दि.१७.०३.२३ चे ०८.०० वा दि. १७.०३.२३ चे ०९.१ ५ वा | मनोज संतोषराव देशमुख वय-४७ वर्ष रा. शांती नगर तांत्रिक कॉलनी चैतन्य कॉलनी जवळ अमरावती | १ मंगेश भानुदास झिंगळे वय-३६ वर्ष रा. कुभांरवाडा गोपाल नगर जवळ अमरावती  २ अमोल पुर्ण नाव माहीत नाही रा. बडनेरा अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की यातील फियादी नामे मनोज संतोषराव देशमुख वय-४७ व्यवसाय बिल्डरशिप रा. शांती नगर तांत्रीक कॉलनी चैतन्य कॉलनी जवळ अमरावती यांनी पो स्टेला जबानी रिर्पोट दिला की वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासह राहतो व बिल्डरशिप करतो. माझे गुरुमाउली रेसीडेंसी या नावाने अर्पाटमेंट चे बांधकाम वैशाली विहार बडनेरा येथे सध्या सुरु आहे. सदर बांधकामाचे ठिकाण हे मोकळे असुन तेथे बांधकामातील लोखंडी साहीत्य ज्यामध्ये लोखंडी लहान बार , लोखंडी रिंगा व लोखंडी लहान बार, लोखंडी रिंगा व लोखंडी कळया याप्रमाणेचे अंदाजे २० ते २५ हजाराचे सामान तेथे ठेवलेले आहे. सदर बाधंकामाच्या साईटवर देखरेख करण्याकरीता दिपक शंकरराव जोंधळे वय-३९ वर्ष रा. ब्राम्हणवाडा भगत ता जि. अमरावती यास चौकीदार म्हणुन ठेवण्यात आले आहे. आज दि. १७.०३.२०२३ रोजी सकाळी ०६.०० वा. गुरुमाउली रेसीडेंसी चे बाधकामावरील चौकीदार दिपक शंकरराव जोंधळे याने एक इसम पकडुन ठेवला होता दरम्यान त्याने मला सांगीतले की तो सदर बांधकाम चालु असलेला ठिकाणी चौकीदारी करीत हजर असतांना दरम्यान २ इसम एका डिस्कव्हर मोटरसायकलवर आले व त्यानी  मो. सा. बांधकामाच्या ठिकाणाच्या बाजुला उभी केली त्यानंतर ते दोन्ही इसम बांधकामाचा लोहा चोरी करतांना मला दिसले. त्यावरुन मी आरडा ओरड केली असता ते दोघेहि पळुन जात होते मी त्यांचा पाठलाग करुन त्यामधील एका इसमास पकडले व त्याचा साथीदार तेथुन पळुन गेला असल्याचे सांगीतले. दरम्यान तेथे वैशाली विहारात राहत असलेल्या विलास किसनराव राटोड यानी डायल ११२ वरुन पोलीसांना तेथे बोलावीले त्यानंतर पोलीस तेथे आले व पोलीसांनी पकडलेल्या इसमास आमचे समक्ष नाव विचारले असता त्याने आपले नाव मंगेश भनुदास झिंगळे वय-३६ वर्ष रा. कुंभारवाडा गोपाल नगर अमरावती असे सांगीतले दरम्यान पोलीसांनी त्याच्यासोबत असलेल्या त्यांचया पळुन गेलेल्या साथीदाराचे नाव विचारले असता त्याने त्याचया साथीदाराचे नाव अमोल असे सांगुन पुर्ण नाव माहीत नसल्याचे सांगीतले त्यानंतर आलेल्या पोलीसांनी मंगेश झिंगळे यास ताब्यात घेतले त्यानंतर मी पोलीसांचे पाठोपाठ सदर बाबीचा रिर्पोट देण्यास पोलीस स्टेशन ला आलो आहे तरी आज दि. १७.०३.२०२३ चे रोजी सकाळी ०६.०० वा दरम्यान मंगेश भानुदास झिंगळे वय-३६ वर्ष रा कुभरवाडा गोपाल नगर जवळ अमरावती आणि त्याचा अमोल नावाचा साथीदार यांनी मिळुन माझे वैशली वीहार बडनेरा येथील गरुमाउली रेसीडेसी अर्पाट मेंटच्रया बांधकामाचे खुल्या जागेत पडलेल्या बांधकामाच्या लोखंडी साहीत्याची चोरी करण्याचा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | प्रयत्न केल्याने त्यांचेविरुध्द माझी कायदेशीर फिंयाद आहे कार्यवाही होणेस विनती आहे . अशा फिर्यादीच्या जबानी रिर्पोट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ वाहन चोरी :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पोस्टे राजापेठ अप क्र. २७८/२३ कलम ३७९ भा.द.वि. | दस्तुर नगर चौक अमरावती | दि. १०/०२/२३ चे २०-०० वा.<br><br>दा. ता. वेळ - दि. १७/०३/२३ चे १२.५२ वा. | संतोष अर्जुन निंदाने वय ३० वर्ष रा. कवर नगर सेवा मंडळ चे बाजुला अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे सानु बार समोर स्वताची हिरो स्प्लेन्डर काळया रंगाची निळा पट्टा असलेली गाडी क्र. MH २७ BD २००८ इंजिन क्र. HA१०EJEHB०११४७, चेचिस क्र. MBLHA१०AMEHB१६१५५ कि.अं. ५०,००० रू. पार्क करून बार मध्ये जावुन एका तासाने परत आले असता ठेवलेल्या ठिकाणी गाडी मिळुन आली नाही. ती कोणीतरी अज्ञात व्यक्तीने चोरून नेली. अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ पळवुण नेणे :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २. | पो स्टे गाडगे नगर अमरावती | अमरावती | दि १६-०३-२३ चे १४.०० ते १५-०० वा | आकाश देविदास इंगोले वय २८ वर्ष धंदा शिक्षण रा | अज्ञात इसम | यातील हकीकत अश्याप्रकारे आहे की नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचा नातेवाईक वय ६ वर्ष याला कोणीतरी अज्ञात इसमाने दुचाकीवर येऊन जबरदस्तीने पळवुन नेण्याचा प्रयत्न केला . पिडीतास याबाबत विचारले असता त्याने सांगितले की, एक माणुस आला त्याने मला पकडुन सोबत चल म्हणाला मी नाही म्हटले तर त्याने कापुस काढुन माझे नाका तोंडावर लावला त्यामुळे मी जोरात मम्मी मम्मी ओरडलो व तो अनोळखी माणुस पळुन गेला. असे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अप क्र ३६५/२३ कलम ३६३,५११ भादवि | | दरम्यान<br>दि १७-०३-२३ चे ०२.३२ वा | अमरावती | | चि. रुद्रा याने सांगितले करिता चि यास कायदेशीर पालकाच्या ताब्यातुन यातील अज्ञात आरोपीने पकडुन नेण्याचा प्रयत्न केला.अश्या फि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ विश्वासघात (फसवणुक) :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| ३. | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र ३६७/२३ कलम ४०६,४२०,४६८,४७१,५०६,५००,५०१ भादवि | एन सी सी कॅन्टिंग समोरील बिल्डिंग कॅम्प अमरावती | दि०१-१०-२०२२ चे ०५-०१-२३ पावेतो.<br>दि.१७.०३.२०२३ चे ०१.०७ वा | जयप्रकाश नारायणराव बनकर व्यवसाय डॉक्टर रा तारांगण नगर शेगाव नाका अमरावती | रोहन मधुकरराव भेंडे रा करजगाव ता चांदुरबाजार जि अमरावती ह मु ५०८/१ महादेव वाडी रोहा कोलाड जि रायगड पो स्टे कोलाड | हकिकत याप्रमाणए आहे की,यातील फिर्यादी यांचा मुलगा नामे सादिपन ह्यास लता मंगेशकर मेडीकल कॉलेज नागपुर येथे एम बीब बी एस ला इस्टिट्युशनल कोट्यातुन ॲडमीशन करुन देतो असे यातील आरोपी याने फि यांना सांगितल्यावरुन यातील एका महिलेच्या मधअयेस्थीने त्यांचे घरी दि.०१.१०.२०२२ रोजी २५००००० रु रोख , दि.०७.०१०.२२ रोजी २००००० रु रोख, दि.०९.१०.२२ रोजी ४२,५०,६९० चेक कॅन्सल , दि.०९.१०.२०२२ रोजी ५७,५०,००० रु रोख, दि.०२.११.२०२२ रोजी २००००० रु फार्म सबमिशन , दि.१५.११.२२ रोजी ४७,००,००० रु असे एकुण १,३३,५०,००० रु फिर्यादी यांनी यातील आरोपीवर विश्वास ठेवुन तुमच्या मुलाची लता मंगेशकर मेडीकल कॉलेज नागपुर येथए ॲडमिशन करुन देतो असे म्हणउन फि यांनी विश्वास ठेवुन १,३३,५०,००० रु रोख रक्कम व चेक द्वारे यातील आरोपी यांना देवुन फि यांचा विश्वासघात करुन मुलाची ॲडमिशन न करता फसवणुक केली. फि यांनी आरोपी याचा पैसे वापस करण्याबाबत विनंती केली असता त्याने फि यांना धमकी चे व्हीडीओ पाठवुन मानसिक त्रास देवुन समाजात तुमची बदनामी करु असे म्हणुन आरोपीने फि यांनी व्ही आर ओ प्रा. कंपनी चे दोन दि. ०५.११.२३ रोजी दोन पो स्टडेटेड(पीडीसी) चेक दिले होते.ते बॅकेमध्ये डिपॉझीट केले असता दोन्ही चेकवर यातील आरोपी याने खोट्या सह्या असल्याचे बॅकद्वारे समजले व तसेच अकाउंट मध्ये रक्कम सुदधा अनसफिसीयंट आहे.त्यामुळे फि यांनी यातील आरोपीत याचा लेटर द्वारे दुसरे चेक पाठविण्याची व बॅकमध्ये फंड सफिशियंट ठेवण्याची विनंती केली असता परत धमकी चा व्हिडीओ पाठविला.अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ अकस्मात मृत्यु :-

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|

| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे बडनेरा मर्ग क्र.१९ /२३ कलम १७४ जा फौ. | नरखेड रेल्वे लाईन शिवाजी नगर नं.२ | विठोबा उर्फ वीठ्ठल तुकाराम बडगुजर वय-५८ वर्ष रा. शिवाजी नगर ं.२ | दिनेश डोंगरदास परसाले वय-५० वर्ष रा. देवी धनश्री कॉलनी दस्तुर नगर अमरावती | रेल्वेने कटुन मरण पावले | हकीकत अश प्रकारे आहे की यातील मयत विठोबा उर्फ वीठ्ठल तुकाराम बडगुजर मांडवे वय-५८ वर्ष रा. शिवाजी नगर नं.२ अमरावती हे फीयादीचे जावई असुन ते गेल्या अंदाजे ७ते८ वर्षा पुर्वीपासु कुठलाही काही धंदा करीत नसुन ते दार पीण्याचे सवयीचे होते ते नेहमी च अति प्रमाणत दारुचे सेवन करीत असल्यामुळे ते कुठेही दारुचे नशेत पडुन राहत असायचे त्याचप्रमाणे ते दि .१६.०३.२०२३ रोजी रात्री अंदाजे ११.३० वा ाचे पुर्वा त्यांनी दारुचे अति सेवन केल्यामुळै ते नशेमध्ये शिवाजी नगर भगातील नरखेड रेल्वेलाईनवर पडुन राहीले असावे व त्यामुळेच रेल्वेने कटुन मरण पावले असावे असे मला वाटते तरी असे मरणबाबत माझ कोणवा काहीही संशय नाही<br>हाच जबानी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल |